**फौजदारी प्रकिंया संहितेचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराची साक्ष**

**नि.फौ.ख.क्र.७४/२०१७**
**सरकार वि. विनोद**
**निशाणी क्र.०४**

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – भावना श्रीकांत ठवकर

वय – ४३ वर्ष, व्यवसाय – खाजगी

राहणार – इंदीरा नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जि. नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एम.एम.पंचारीया यांच्यातर्फे**

घटना दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ६.०० ते ७.०० वाजताच्या दरम्यान माझ्या घरासमोर घडली होती. त्यादिवशी आरोपी आमचे कम्पांउडचे दार उघडून आत आला व घान घान बोलत होता. त्यावेळी तो दारू पिलेला होता. त्यावेळी त्याने मला घरातून बाहेर ओढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी माझे सासरे रामभाऊ आले व आरोपीला थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्यांना धक्काबुक्की केली. त्यावेळी माझे पती श्रीकांत याने सुध्दा आरोपीला समजविण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपीने त्यांना धक्का दिला, त्यामुळे ते खाली पडले. त्यावेळी माझे पतीच्या डाव्या पायाला दुखापत झाली. त्यानंतर आम्ही पोलीसात तक्रार दिली. आता मला माझी फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे, परंतु सही असलेला भाग फाटलेला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ०५** देण्यात येते. आता मला छापील फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ०६** देण्यात येते. आरोपी सध्या कुठे राहतो याची मला कल्पना नाही. घटनेला बराच कालावधी झाल्यामुळे मला प्रस्तुतची केस पुढे चालवायची नाही.

**सरतपास संपला.**

**प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी फरारी असल्यामुळे आरोपीच्या अनुपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे, आरोपीतर्फे उलटतपास नाही. फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.04.20 13:48:48 +0530

कामठी

दिनांक २०.०४.२०२६

(रा.र. शेरेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कोर्ट नं.२, कामठी.